

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त हार्दीक शुभेच्छा!

- संपादक

सायं दैनिक

नांदेड वार्ता

www.nandedwarta.com



• वर्ष २५ वे • अंक ५८ • मंगळवार दि.२४ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

भाजप-अकाली दलची सहा वर्षानंतर हातमिळवणी



नवी दिल्ली:मतदारसंघ पुनर्रचना विधेयक आणि आगामी पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज दिल्लीत मोठी घडामोड झाली. सत्ताधारी एनडीए सोडून गेलेल्या पक्षाने आज भाजपसोबत युतीची घोषणा केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत या युती घोषणा करण्यात आली.

आगामी पंजाब विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज भाजप आणि शिरोमणी अकाली दलाच्या युतीची घोषणा करण्यात आली. भाजप मुख्यालयात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन आणि पक्षाच्या इतर वरिष्ठ नेत्यांनी सुखबीर सिंह बादल यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. या वेळी दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. शिरोमणी अकाली दलसोबत आल्यानंतर आता राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा विस्तार पूर्ण झाला आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पत्रकार परिषदेत म्हटले. आमचा जुना मित्र पुन्हा एनडीए आघाडीत आल्याने आनंद वाटत असल्याची भावना शाह यांनी व्यक्त केली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या नेतृत्वात झालेल्या बैठकीत शिरोमणी अकाली दल आणि भाजपने आगामी पंजाब विधानसभेच्या निवडणुका एकत्रित लढण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले असल्याची माहिती शाह यांनी दिली. या पत्रकार परिषदेत अमित शाह यांनी पंजाब निवडणुकीचा अजेंडाही स्पष्ट केला. हिंदू-शीख समुदायातील एकता आणि राष्ट्रवाद हे आमच्यासाठी महत्त्वाचे असणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भ्रष्टाचारमुक्त आणि नशामुक्ती हे मुद्दे हे महत्त्वाचे असणार असल्याचे त्यांनी सूचित केले. यावेळी त्यांनी पंजाबमधील आप सरकारवर हल्लाबोल केला. शिरोमणी अकाली दल आणि भाजप यांचे युती सरकार १० वर्षांपूर्वी पंजाबच्या सत्तेवर होते. काँग्रेसने अकाली दल-भाजपचा पराभव केला. त्यानंतर मागील विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांनी स्वतंत्र निवडणुका लढवल्या. मात्र, दोन्ही पक्षांना यश मिळाले नाही. आम आदमी पक्षाने पहिल्यांदाच पंजाबात सत्ता मिळवली. त्यानंतर आता अकाली दल आणि भाजपने पंजाब निवडणुकीसाठी युतीची घोषणा केली आहे.

डीआयजीच्या पथकाची नांदेडमध्ये धाड; ६८ लाखांचा गुटखा जप्त



नांदेड/प्रतिनिधी-जुन्या नांदेड शहरातील ईस्लामपूरा व आस कॉलनी येथे विशेष पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयातील पथकाने सोमवारी धाडी टाकुन ६८ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे.

ईस्लामपूरा भागातील एका ट्रान्सपोर्टच्या गोडाऊनमध्ये व आस कॉलनी येथील एका घरामध्ये गुटख्याचा अवैध साठा साठवून ठेवल्याची माहिती विशेष पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांना मिळाली. त्यांच्या आदेशावरुन कार्यालयातील पोलीस पथकाने सोमवारी ईस्लामपूरा भागातील आमेर फंक्शन हॉलजवळ असलेल्या एका खोलीत व सेंट्रल ट्रान्सपोर्ट कंपनीच्या गोडाऊनवर छापा टाकला. दोन्ही ठिकाणी शासनाने प्रतिबंधीत केलेल्या विविध कंपनीचा ५४ लाख रुपयांचा गुटखा पोलीसांना आढळून आला. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात सय्यद दस्तगीर स.इब्राहीम रा.आस कॉलनी, अब्दुल बबलू अब्दुल हमीद रा.मुदखेड, मो.आसीफ मो. हुसेन रा.चुनाभट्टी, खुदबईनगर, अब्दुल तसलीम अब्दुल मन्नान सौदागर रा.गुलशन कॉलनी, इतवारा यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर पोलीस पथकाने नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आस कॉलनी येथे मोहम्मद फिरोज सईद यांच्या घरावर छापा टाकला. घरामध्ये १४ लाख १९ हजार रुपयांचा गुटख्याचा साठा पोलीसांनी जप्त केला. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात मो.फिरोज मो.सईद व मो.फैज मो.सईद रा.आस कॉलनी, नांदेड यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई फौजदार पंकज इंगळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस जमादार प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे, गजानन डवरे यांनी केली आहे. डीआयजीच्या पथकाने इतवारा व नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुटखा माफीयांवर केलेल्या कारवाईमुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी शरणकुमार लिंबाळे



मुंबई/प्रतिनिधी-मराठी साहित्यविश्वातून एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ज्येष्ठ साहित्यिक, कादंबरीकार, समीक्षक आणि दलित साहित्याचे अभ्यासक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे, याची अधिकृत घोषणा थोड्याच वेळात होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी अनेक ज्येष्ठ साहित्यिकांची नावे चर्चेत होती. त्यामध्ये विजय कुवळेकर, बाबा भांड यांच्यासह काही नावांची चर्चा होती, यात डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाला आहे.

१०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित करण्याचे नियोजन आहे. मराठी साहित्य संमेलनाच्या शंभराव्या वर्षाचा हा महत्त्वपूर्ण टप्पा असल्यामुळे साहित्यिक, लेखक, कवी, प्रकाशक आणि वाचकांमध्ये या संमेलनाबद्दल विशेष उत्सुकता आहे.डॉ. शरणकुमार लिंबाळे हे मराठीतील ज्येष्ठ लेखक, कवी, कादंबरीकार, समीक्षक आणि विचारवंत आहेत. त्यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर या गावात १ जून १९५६ रोजी झाला आहे. एम.ए. आणि पीएच.डी. पर्यंत त्यांचे शिक्षण झाले आहे. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी साहित्यातील आत्मकथा, कादंबरी, कविता, कथा, समीक्षा आणि वैचारिक लेखन केले आहे. त्यांच्या लेखनातून दलित समाजाचे वास्तव, जातिव्यवस्था, सामाजिक विषमता, संघर्ष, मानवी प्रतिष्ठा आणि परिवर्तनाची भूमिका प्रभावीपणे मांडली गेली आहे.त्यांची अक्करमाशी ही आत्मकथा मराठी साहित्यात विशेष महत्त्वाची मानली जाते. या पुस्तकाचे अनेक भारतीय भाषांमध्ये *पान ४ वर*

धर्माबादेत एफडीए पथकाचा दौरा की,केवळ चौकशीचा फार्स?

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरासह तालुक्यात अवैध तांदूळ साठवणूक, विक्री तसेच प्रतिबंधित गुटखा व अन्य कथित व्यवहारांबाबत वारंवार चर्चा होत असताना अन्न व औषध प्रशासनाचे एफडीए पथक धर्माबादमध्ये दाखल झाले. पाहणी झाली, चौकशी झाली आणि पथक परतही गेले, मात्र या दौऱ्यानंतर नेमकी कोणती कारवाई झाली? किती साठा जप्त केला? कोणावर गुन्हा दाखल केला? याची ठोस माहिती अद्याप समोर आलेली नाही. मग हा दौरा कारवाईसाठी होता की, केवळ कागदी घोडे नाचवण्यासाठी? विशेष म्हणजे पथकाच्या दौऱ्यानंतर शहरात आर्थिक तडजोडीच्या चर्चांना उधाण आल्याने नागरिकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

धर्माबादमध्ये अवैध तांदूळ आणि गुटखा व अन्य व्यवहारांबाबत तक्रारी व चर्चा होत असताना संबंधित यंत्रणेने प्रत्यक्ष धडक कारवाई करणे अपेक्षित होते. संशयित ठिकाणांची सखोल तपासणी, साठ्याची पडताळणी, नमुने संकलित करणे, दोषींवर कायदेशीर कारवाई आणि जप्तीचा पंचनामा अशा ठोस बाबी नागरिकांना अपेक्षित होत्या. मात्र पथकाच्या दौऱ्यानंतरही परिस्थितीत काय बदल झाला, हे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे प्रश्न असा आहे की, पथकाने नेमकी कोणती ठिकाणे तपासली? कोणाचे जबाब घेतले? कोणत्या वस्तूंचे नमुने घेतले? संशयास्पद साठा आढळला की नाही? आणि आढळला असेल तर पुढे कारवाई का झाली नाही? पथक येण्यापूर्वीच संबंधित व्यावसायिकांना तपासणीची माहिती मिळाली होती का? तपासणी दरम्यान सर्व व्यवहारांची सखोल पडताळणी झाली का? की केवळ वरवरची पाहणी करून औपचारिकता पूर्ण करण्यात आली? हे प्रश्न आता जनतेतून उपस्थित होत आहेत. जर सर्व काही नियमांनुसार असेल, तर प्रशासनाने घाबरण्याचे कारण काय? पथकाचा संपूर्ण तपासणी अहवाल, जप्तीची माहिती आणि केलेल्या कारवाईचा तपशील सार्वजनिक करण्यास हरकत काय? अन्न व औषध प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी धर्माबाद दौऱ्याचा सविस्तर अहवाल जाहीर करावा. अवैध तांदूळ आणि गुटखा अन्य व्यवहारांवर नेमकी कोणती कारवाई झाली, याचा खुलासा करावा. दोषी आढळले असतील तर त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. तसेच पथकाच्या कामकाजात कोणतीही अनियमितता झाली आहे का, याचीही निष्पक्ष चौकशी व्हावी. आता प्रशासनाने स्पष्ट करावे एफडीए पथकाचा दौरा खरोखर कारवाईसाठी होता की केवळ उपस्थिती दाखवण्यासाठी? अशी चर्चा जनतेत सुरु आहे.

किनवटच्या विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर

आ.केराम यांच्या पाठपुराव्याला यश



किनवट/प्रतिनिधी-किनवट शहराच्या विविध विकास कामांसाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून 'वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत' तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आ.भीमराव केराम यांच्या विकासात्मक दृष्टिकोनातून आणि विशेष पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध झाला असून, शहरातील नागरी सुविधांच्या विकासाला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

या संदर्भात भाजपाचे किनवट मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांनी माध्यमांना सविस्तर माहिती दिली. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने १९ नोव्हेंबर रोजी शासन निर्णय निर्गमित करून या निधीस अधिकृत मंजुरी दिली आहे.या सर्व कामांची अंमलबजावणी किनवट नगरपरिषदेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. मंजूर झालेल्या ५ कोटी रुपयांच्या निधीतून शहरात सहा महत्त्वाची विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत. यामध्ये शहरातील आवश्यक ठिकाणी स्ट्रीट लाईट व पोल बसविण्यासाठी २ कोटी ५० लाख रुपये, नगरपरिषदेच्या जागेवर विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका बांधण्यासाठी १ कोटी रुपये, आरक्षण क्रमांक ३० येथील शॉपिंग सेंटर इमारतीत विद्युतीकरणासाठी ५० लाख रुपये, प्रभाग क्रमांक ५ मधील आर्य वैश्य कॉलनी येथे सभागृह बांधण्यासाठी ५० लाख रुपये, प्रभाग क्र.८ मध्ये भोई समाजासाठी समाजमंदिर बांधण्यासाठी ३० लाख रुपये आणि प्रभाग क्रमांक ४ मधील बौद्ध समाज मंदिराच्या उर्वरित कामासाठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आ.केराम यांनी नेहमी प्रमाणेच दूरदृष्टी ठेवून आणि समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन शहराचा सर्वसमावेशक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. आगामी काळातही किनवट शहराच्या सर्वांगीण विकासासाठी असाच पाठपुरावा सुरू राहील, असा विश्वास भाजप मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांनी यावेळी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या अनुदानावर एजंटांचा डल्ला;कृषी विभागाचे मौन संशयास्पद

ठिबकसाठी हेक्टरी दीड तर तुषारसाठी एक हजारांची कथित वसुली

माहूर/प्रतिनिधी-निसर्गाच्या लहरीपणामुळे खरीप हंगाम हातचा गेला, पावसाअभावी पिके करपली आणि शेतकरी आर्थिक संकटात सापडला. अशा परिस्थितीत शासनाच्या अनुदानाचा आधार मिळेल, या आशेने शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून ठिबक, तुषार सिंचन आणि कृषी यांत्रिकीकरण योजनांसाठी ऑनलाइन अर्ज केले. पूर्वसंमती मिळाल्यानंतर कर्ज काढून, पदरमोड करून शेतात सिंचन संच बसविले, कृषी अवजारांची खरेदी केली. मात्र, आता अनुदान मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या स्थळ पाहणी अहवालाच्या नावाखाली शेतकऱ्यांची कथित आर्थिक पिळवणूक होत असल्याचे गंभीर आरोप समोर येत आहेत.

ठिबक सिंचनासाठी हेक्टरी दीड हजार रुपये, तुषार सिंचनासाठी १ हजार रुपये, तर मळणी यंत्र, ट्रॅक्टर, रोटाव्हेटर आणि इतर ट्रॅक्टरचलित अवजारांच्या स्थळ पाहणी अहवालासाठी १० हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेची मागणी खाजगी व्यक्तीकडून केली जात असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, मागितलेली रक्कम देण्यास नकार दिल्यास स्थळ पाहणी अहवाल सादर केला जाणार नाही, अशी धमकी दिली जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. म्हणजे शासनाच्या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर आधी खाजगी एजंटांची कथित वसुली सहन करायची का? शेतकऱ्यांनी अनुदानासाठी अर्ज करायचे, स्वतःच्या पैशातून साहित्य खरेदी करायचे, त्यानंतर पाहणीची प्रतीक्षा करायची आणि शेवटी अहवालाच्या नावाखाली पैशांची मागणी सहन करायची, हा कोणता न्याय? स्थळ पाहणी अहवाल तयार करण्याची अधिकृत जबाबदारी नेमकी कोणाची आहे? खाजगी व्यक्तींना या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणी दिला? त्यांच्या माध्यमातून पाहणी केली जात असेल, तर त्यामागे कृषी विभागातील कोणाचे पाठबळ आहे? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. शासन एकीकडे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी, सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि शेतीच्या यांत्रिकीकरणाला चालना देण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या योजना राबवित असल्याचा गाजावाजा करते; मात्र दुसरीकडे त्याच योजनांच्या अंमलबजावणीत शेतकऱ्यांना कथित पैशांच्या मागणीला सामोरे जावे लागत असेल, तर कृषी विभागाच्या कार्यक्षमतेचे आणि पारदर्शकतेचे दावे नेमके कशासाठी? शेतकऱ्यांना अनुदान देण्याऐवजी त्यांच्या अडचणींचा गैरफायदा घेऊन कोणी खिसे भरत असेल, तर अशा प्रकारांना अभय कोणाचे? भीतीपोटी अनेक शेतकरी तक्रार करण्यास पुढे येत नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन गोपनीय पथकामार्फत सखोल चौकशी करावी. शेतकऱ्यांकडून पैशांची मागणी करणारी खाजगी व्यक्ती नेमकी कोण आहे, ती कोणाच्या सांगण्यावरून वसुली करीत आहे, स्थळ पाहणी अहवालाच्या प्रक्रियेत तिचा हस्तक्षेप कसा आणि संबंधित विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची त्यात काही भूमिका आहे का, याचा पर्दाफाश झाला पाहिजे. आणि चौकशी अंती दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी पुढे अली आहे. पात्र शेतकऱ्यांचे अहवाल कोणत्याही आर्थिक मागणीशिवाय सादर करून त्यांना नियमानुसार अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा करावा. आधीच दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर कथित वसुलीचे मीठ चोळले जात असेल, तर ही बाब अत्यंत संतापजनक आहे. शेतकऱ्यांना अनुदान हवे आहे, एजंटांचा जाच नको! कृषी विभागाने आता मौन सोडून या कथित वसुलीच्या प्रकाराचा छडा लावावा, अन्यथा शेतकऱ्यांच्या नावाने राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ नेमका शेतकऱ्यांना होतो की मध्यस्थांना, हा प्रश्न अनुत्तरितच राहील.

भारत-नेपाळ मैत्रीचे नवे पर्व!

भारत आणि नेपाळ या दोन देशांमधील संबंध हे केवळ दोन शेजारी राष्ट्रांमधील राजनैतिक संबंध नाहीत, तर ते शतकानुशतके चालत आलेल्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक आणि भावनिक नात्याचे प्रतीक आहेत. भारताच्या सीमेवर वसलेला नेपाळ भौगोलिकदृष्ट्या छोटा देश असला तरी दक्षिण आशियातील राजकीय आणि सामरिक समीकरणांमध्ये त्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे नेपाळचे नवे पंतप्रधान बालेन शाह यांची पहिली भारत भेट आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेली चर्चा याकडे केवळ औपचारिक राजनैतिक कार्यक्रम म्हणून पाहता येणार नाही. भारत-नेपाळ संबंधांना नवी दिशा देणारी ही भेट ठरण्याची शक्यता आहे.नेपाळचा राजकीय इतिहास अनेक चढ-उतारांनी भरलेला आहे. दीर्घकाळ राजेशाहीच्या नियंत्रणाखाली असलेल्या या देशात लोकशाहीसाठी संघर्ष झाला. २००८ मध्ये राजेशाही संपुष्टात आली आणि नेपाळने धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताकाचा मार्ग स्वीकारला. त्यानंतरही राजकीय अस्थिरता, सत्तांतर आणि नेतृत्वातील संघर्ष यामुळे नेपाळला स्थिर सरकार देण्याचे आव्हान कायम राहिले. अलीकडील तरुणांच्या आंदोलनातून निर्माण झालेल्या राजकीय बदलानंतर बालेन शाह यांच्या नेतृत्वाला संधी मिळाली. काठमांडूचे महापौर म्हणून काम केलेले आणि तरुणांमध्ये लोकप्रिय असलेले बालेन शाह आता देशाचे पंतप्रधान झाले आहेत. त्यांच्या नेतृत्वाकडून भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, रोजगार निर्मिती आणि विकासाच्या नव्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.या पार्श्वभूमीवर बालेन शाह यांची भारत भेट महत्त्वाची ठरते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे केलेले स्वागत आणि हैदराबाद हाऊसमध्ये झालेली द्विपक्षीय चर्चा या दोन्ही देशांमधील संबंधांबाबत सकारात्मक संकेत देणारी आहे. विशेष म्हणजे या भेटीत आठ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. आरोग्य, आयुर्वेद, अंतराळ तंत्रज्ञान, उपग्रह संपर्क व्यवस्था, नागरी विकास, पशुधन आणि मत्स्यव्यवसाय तसेच सुरक्षा आणि प्रशासकीय प्रशिक्षण अशा विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. या करारांमुळे दोन्ही देशांमधील सहकार्य केवळ पारंपरिक संबंधांपुरते मर्यादित न राहता आधुनिक तंत्रज्ञान आणि विकासाच्या क्षेत्रातही विस्तारू शकते.या भेटीतील सर्वाधिक लक्षवेधी निर्णय म्हणजे अयोध्या ते जनकपूर दरम्यान सुरू करण्यात आलेली सरयू-कमला एक्स्प्रेस रेल्वे सेवा. अयोध्या हे प्रभू श्रीरामाचे जन्मस्थान, तर जनकपूर हे माता सीतेचे जन्मस्थान म्हणून ओळखले जाते. या दोन धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांना रेल्वेने जोडणे ही केवळ वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा नाही, तर भारत आणि नेपाळच्या शतकानुशतकांच्या सांस्कृतिक संबंधांना आधुनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न आहे. या रेल्वेमुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल, दोन्ही देशांतील नागरिकांचा संपर्क वाढेल आणि सीमापार आर्थिक व्यवहारांनाही मदत होईल. रामायणाच्या सांस्कृतिक परंपरेला जोडणारा हा उपक्रम निश्चितच स्वागतार्ह आहे.पंतप्रधान मोदी यांनी नेपाळसाठी २४ हजार कोटी नेपाळी रुपयांच्या विकास सहाय्याची घोषणा केली आहे. भारतीय चलनात हे सहाय्य १५ हजार कोटी रुपये आहे. त्यामध्ये आपत्तीपश्चात पुनर्बांधणी आणि पायाभूत सुविधांसाठी ३,५०० कोटी रुपयांचे अनुदान, तर ऊर्जा क्षेत्रातील प्रकल्पांसाठी ११,५०० कोटी रुपयांची कर्जसुविधा समाविष्ट आहे. अलीकडील विनाशकारी पुरामुळे नेपाळमध्ये मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत भारताने मदतीचा हात पुढे करणे हे शेजारधर्माचे उत्तम उदाहरण आहे. मात्र या आर्थिक सहाय्याचा उपयोग पारदर्शक पद्धतीने होऊन त्याचा लाभ सामान्य नेपाळी नागरिकांपर्यंत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. भारतासाठी नेपाळचे महत्त्व केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक संबंधांपुरते मर्यादित नाही. चीन आणि भारत यांच्यामधील भौगोलिक स्थानामुळे नेपाळचे सामरिक महत्त्व मोठे आहे. चीनने नेपाळमध्ये पायाभूत सुविधा, व्यापार आणि गुंतवणुकीच्या माध्यमातून आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे भारताने नेपाळशी संबंध दृढ करताना त्याच्या सार्वभौमत्वाचा आणि स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा आदर करणे आवश्यक आहे. नेपाळला केवळ भारताच्या प्रभावक्षेत्रातील देश म्हणून पाहण्याची भूमिका योग्य ठरणार नाही. समानता, परस्पर विश्वास आणि परस्पर हित या आधारावरच मैत्री टिकू शकते.भारत आणि नेपाळ यांच्यात खुली सीमा, रोजगार, व्यापार, ऊर्जा, पाणीवाटप आणि सुरक्षेसारखे अनेक प्रश्न आहेत. काही वेळा सीमावाद आणि राजकीय हस्तक्षेपाच्या आरोपांमुळे संबंधांमध्ये तणावही निर्माण झाला आहे. त्यामुळे केवळ मोठमोठ्या घोषणा आणि सामंजस्य करार करून भागणार नाही. त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. नेपाळच्या विकासात भारताचा सहभाग वाढला पाहिजे; पण त्याचवेळी नेपाळच्या स्वाभिमानाला आणि स्वतंत्र अस्तित्वाला धक्का लागणार नाही, याचीही काळजी घेतली पाहिजे. शेजारी देश असलेल्या नेपाळमध्ये राजकीय स्थैर्य, आर्थिक प्रगती आणि लोकशाही मजबूत होणे हे भारताच्याही हिताचे आहे. बालेन शाह यांच्या नव्या नेतृत्वासमोर अपेक्षांचे मोठे आव्हान आहे. भारताने या नेतृत्वाला सहकार्य करताना केवळ सरकारशी नव्हे, तर नेपाळच्या जनतेशी असलेले नातेही अधिक दृढ केले पाहिजे. अयोध्या-जनकपूर रेल्वे, आठ सामंजस्य करार आणि विकास सहाय्याच्या घोषणेतून भारत-नेपाळ मैत्रीचे नवे पर्व सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. या मैत्रीचा पाया राजकीय सोयीपेक्षा जनतेच्या विश्वासावर उभा राहिला, तरच हिमालयाइतकी दृढ असलेली ही मैत्री भविष्यात अधिक बळकट होईल!

श्री गुरु नानक देवजी यांचा मानवतावाद



श्री गुरु नानक देव यांच्या विचारसारणीमुळे भारत भूमिवर सोळाव्या शतकात शीख धर्म उदयास आला. या ब्रह्माण्डात मानव धर्म हा सर्वात श्रेष्ठ धर्म होय आणि या ब्रह्माण्डाचा स्वामी एक आहे. तो सर्व नियंत्रण करतो, तोच जग चालवतो. गुरु नानक यांनी असा युक्तिवाद जगापुढे मंडला. त्यांच्या विचारसारणीचे जगात स्वागत झाले. त्याच विचारसरणीमुळे या भू- धरावर शीख (सिख) धर्म उदयास आले. गुरु नानक यांनी साधना, भक्ती आणी सेवा करत जीवनव्यापन केला सोबतच गोरगरीब, सर्वसामान्य माणसांसाठी कार्य केले. अंधश्रद्धेत अडकलेल्यांना त्यांनी जिवन जगण्यासाठी नवीन दिशा दर्शवली. या पृथ्वीवर वावरणाऱ्या धर्मांना त्यांनी सन्मान दिले आणि इतर धर्मांचे अनेक मार्गदर्शक तत्व त्यांनी स्वतः आत्मसात करत त्यांचे संग्रहण तयार केले. कालांतराने त्यांचा समावेश श्री गुरु ग्रंथ साहब या ग्रंथात करण्यात आले. गुरु नानक यांनी अंगीकारलेल्या नविन जीवनशैलीला शीख किंवा सिख असे नामकरण झाले. शीख शब्दाचा नेमका अर्थ आत्मसात करणे किंवा सतत शिकत जाणे असा होतो. गुरु नानकांनी समस्त मानवांना एकच मंत्र दिला, एक पिता एकस के हम बारीक. एकाच परमेश्वराची आम्ही संतान होय.

गुरु नानकदेव यांचा ज्या परिस्थितीत अवतरण झाला, त्यावेळी आपल्या देशावर सतत परकीय आक्रमण सुरु होते. ज्याठिकाणी लहान - लहान रजवाडे होते त्या ठिकाणी राजे ऐवजी शासक यांनी सत्ता काबीज केली होती. प्रजेवर जातीनुसार कर लादण्यात येत होते. मानवा-मानावा मध्ये दुरावा निर्माण झालेला होता. गोरगरीब जनता अत्याचारात होरपळत होती. अशा वेळी गुरु नानक देव यांचा ईसवी सन १४६९ मध्ये राय-भोये कर तलवंडी (पाकिस्तान) मध्ये झाला. त्यांचे वडील महता कालू (कल्याणचंद) हे त्या गावाचे पटवारी म्हणून कार्यरत होते. तर आई तृप्त हि गृहणी होती. नानकांना एक मोठी बहीण होती, बेबे नानकी. नानकी यांचा विवाह जयराम यांच्याशी झाला होता. नानकांच्या जीवनात बहिणी बद्दल मोठा जिवाहळा होता.

कोवळ्या वयात त्यांनी व्यवसायासाठी मिळालेल्या २० रुपये खर्च करून उपाशी असलेल्या साधू-संतासाठी लंगर केले आणि त्याला सच्चा सौदा असे नाव दिले. युवक अवस्थेत त्यांनी मोदीखाना मध्ये नौकरी केली आणि सोबतच परमेश्वराची निस्वार्थ भक्ती केली. गुरु नानक यांनी संस्कृत, फारसी, अरबी आणि इतर भाषा अवगत केल्यानंतर विविध धर्मांच्या ग्रंथांचे अभ्यास केले. या जगात कोण-कोणते धर्म अस्तित्वात आहेत, मानव कसले जिवन जगताहेत याचा आढावा घेण्यासाठी गुरु नानक यांनी चार दिशांच्या धर्मयात्रा (तीर्थाटन) केल्या. त्यांच्या ह्या यात्रा उदासी म्हणून ओळखल्या जातात. यात त्यांनी हिंदु तीर्थस्थळांचे दर्शन घेत विविध चाली-रीती जाणून घेतले, तसेच अरब देशात वसलेल्या मुस्लिम धर्माच्या विविध धार्मिक स्थळांना त्यांनी भेट देऊन धर्म जाणून घेतला. त्या काळात इराण, इराक, सुदान, मक्का - मदिना सारख्या अनेक देशांचे भ्रमण करीत दुसरीकडे त्यांनी श्रीलंका सारख्या देशाला ही भेट दिली. यावरून हे लक्षात येते की नानकांनी इतर धर्मांविषयी कितीपत अभ्यास केले होते. आपल्या भ्रमणात त्यांनी हजारोंच्या संख्येत लोकांना भेटी दिल्या. साधू, संत, मुल्ला, मौलवी सहित विद्वान व्यक्तिमत्वाशी त्यांनी धर्मावर, पूजाशैलीवर आधारित चर्चा केली.

स.रविन्द्रसिंघ मोदी
पत्रकार,नांदेड.

गुरु नानक यांना वयाच्या ३८ व्या वर्षी शीख धर्मस्थापने बद्दलचा पहिला साक्षात्कार घडून आला. एके दिवशी, नानक हे आपल्या दोन सेवकांसोबत वेई नदीकाठी भजन करीत बसले होते. त्यांच्या सोबत एक सेवक होता मर्दाना आणि तो मुस्लिम होता. तर दुसरा होता बाला आणि तो हिंदू होता. अचानकपणे नानक भजन अर्ध्यात सोडून उठले आणि सरळ वेई नदीच्या पाण्यात उतरत गेले. पाहता - पाहता नानक नदीच्या मध्य धारेत जाऊन पाण्याखाली बुडून गेले. नानक काय करीत आहेत हे त्यांच्या सेवकांना कळत नव्हते. त्यांनी आरडा-ओरड करायला सुरु केली. पण तो पर्यंत नानक पाण्यात नाहीशे झाले होते. आरडा-ओरड एकून गावातील लोकं नदी काठी जमले. नानक पाण्यात बुडाल्याची बातमी सर्वत्र पसरली गेली. दोन दिवस नानकांना शोधण्यात आले पण ते मिळाले नाहीत. तिसऱ्या दिवशी नानक बुडालेल्या ठिकाणाहून पुन्हा पाण्यावर प्रगट झाले. हे चमत्कार पाहून तिथे जमलेल्यांनी एकच जल्लोष केला की, नानक जिवंत आहेत. नानकांनी काठावर पोहचत एकच वाक्य उचारला ना कोई हिंदू, ना कोई मुसलमान. एक पिता एकस के हम बारीक.

असे म्हण्टले जाते की, नानकांना वेई नदीत परमेश्वराचे साक्षात्कार घडले होते. परमेश्वराशी चर्चा केल्या नंतरच नानकांना खऱ्या धर्माचे बोध झाले असावे. या नंतरच गुरु नानक यांनी जपूजी साहब ही धार्मिक वाणी रचली. जपूजी साहब या वाणीत नानक यांनी या सृष्टीच्या रचनेपासून तर मानवांच्या दैनंदिन व्यव्हारा पर्यंत आपले विचार मांडले आहेत. परमेश्वर हा निराकार असून त्यानेच या ब्रह्माण्डाची रचना केली आहे. या पृथ्वी सारखेच असंख्य ग्रह तारामंडळात आहेत याची पूर्व कल्पना देखील त्यांनी त्या काळात आपल्या वाणीतून दिली हे विचार करण्यायोग्यच आहे. गुरु नानक यांनी आपल्या अनुयायियांना हक्काची कमाई खाण्याचे आणि सर्व जीवजंतूंना हि जगण्याचे अधिकार असल्याचे उपदेश दिले. पापाची कमाई खाऊ नये आणि उपाशी असलेल्यांना अन्नाचे दान करावे, आई - वडिलांचे सम्मान करावे, अंधश्रद्धा बाळगू नये अश्या शिकवणी त्यांनी रुजू केल्या. तर संत असून सुद्धा त्यांनी त्या काळातील शासक बाबर याला उद्देशून पाप का साम्राज्य चालवू नको, गरीब प्रजा हे तुझे कुटुंब होय. त्यांच्यावर अन्याय करू नकोस असे ठणकावून सांगितले होते.

गुरु नानक यांनी शेवटपर्यंत मानव धर्माचे आणि शुद्ध मानव जीवनशैली जगण्यासाठी प्रेरित केले. या पृथ्वीवर ८४ लाख जीव, जंतू आणि प्राणी असून त्यांना हि परमात्मा मिळू शकते असा युक्तिवाद त्यांनी केला. गुरु नानक देव यांनी केलेले उपदेश हे फक्त एका विशिष्ट समाजासाठी नसून मानवांचे कल्याण साधणाऱ्या प्रत्येक मनुष्यासाठी आहे. म्हणून तर शीख समाज रोज एक वाक्य उचारतो, नानक नाम चढ़दिकला, तेरे बहाने सरबत दा भला. श्री गुरु नानकदेवजी यांच्या ५५७ व्या प्रकाशपर्व निम्मित सर्वांना शुभेच्छा.

श्री गुरु नानक देवजी : मानवतेचा दीप, समानतेचा संदेश आणि सुखी जीवनाचा मार्ग!

मानवजातीला प्रेम, सत्य, समानता, बंधुभाव, निस्वार्थ सेवा आणि परमात्म्याच्या स्मरणाचा मार्ग दाखवणारे श्री गुरु नानक देव जी हे केवळ एका धर्माचे संस्थापक नव्हते, तर संपूर्ण मानवजातीचे मार्गदर्शक होते. त्यांनी आपल्या जीवनातून आणि विचारांतून माणसाला माणूस म्हणून जगण्याची खरी शिकवण दिली.

त्यांच्या काळात समाज जात-पात, अंधश्रद्धा, धार्मिक भेदभाव, कर्मकांड आणि सामाजिक विषमतेने ग्रासलेला होता. अशा परिस्थितीत त्यांनी निर्भयपणे सत्याचा आवाज बुलंद केला आणि शिकवले, परमात्मा एक आहे, मानवजात एक आहे आणि प्रत्येक माणूस समान आदरास पात्र आहे.

एक ओंकार सतनाम, करता पुरख, निर्भउ, निर्वैर, अकाल मूरत, अजूनी, सैभं, गुर प्रसाद. परमात्मा एक आहे, तो सत्यस्वरूप, संपूर्ण सृष्टीचा निर्माणकर्ता, निर्भय, निर्वैर, जन्म-मृत्यूच्या बंधनापलीकडे असणारा, स्वयंप्रकाशित आणि सर्वत्र व्याप्त आहे. परमात्मा कोणत्याही एका ठिकाणी, धर्मात किंवा व्यक्तीपुरता मर्यादित नसून संपूर्ण सृष्टीमध्ये त्याचे अस्तित्व आहे. त्याला जाणण्यासाठी बाह्य दिखावा नव्हे, तर निर्मळ मन, नामस्मरण, सत्य आचरण आणि सद्गुरूंच्या शिकवणीची आवश्यकता आहे.

ना को बैरी, ना बिगाना, सगल संग हम कऊ बन आई।

अर्थात, कोणीही आपला शत्रू नाही, कोणी परका नाही; संपूर्ण मानवजातीशी आपले प्रेमाचे नाते आहे.



गुरु नानक देव जी यांच्या जीवनातील सच्चा सौदा हा प्रसंग आजही प्रत्येकाला अंतर्मुख करतो. व्यापारासाठी दिलेल्या पैशातून भुकेल्या लोकांना भोजन देऊन त्यांनी शिकवले की गरजूंची मदत करणे आणि मानवतेची सेवा करणे हाच खरा नफा आहे. त्यांच्या शिकवणीतून नाम जपो, किरत करो, वंड के छको, परमात्म्याचे स्मरण करा, प्रामाणिक मेहनत करा आणि मिळालेल्या कमाईतून इतरांसोबत वाटून घ्या, हा जीवनाचा सुंदर मार्ग मिळतो.

राजेंद्रसिंघ शाहू
इलेक्ट्रिकल ट्रैनर,नांदेड.

त्यांनी स्त्रियांना सन्मानाचे स्थान दिले. जात-पात न मानता सर्वांना एकत्र बसून भोजन करण्याची लंगर परंपरा सुरू करून समानतेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून जगासमोर ठेवला. निसर्गाबद्दलही त्यांचे विचार अत्यंत दूरदृष्टीचे होते. पवन गुरु, पाणी पिता, माता धरत महत. हवा गुरु, पाणी पिता आणि पृथ्वी माता आहे; निसर्गाचा आदर व संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. आज माणूस पैसा कमावतो, परंतु मनःशांती हरवतो; नाती जोडतो, परंतु प्रेम आणि विश्वास कमी होतो. अशा काळात गुरु नानक देव जी यांची शिकवण अधिक महत्त्वाची आहे. दुसऱ्याला दुःख देण्याऐवजी आधार द्या, अन्यायाविरुद्ध आवाज उठवा, अहंकार सोडा, मेहनतीने जगा, परमात्म्याचे स्मरण करा आणि आपल्या जीवनाचा उपयोग इतरांच्या कल्याणासाठी करा.

गुरु नानक देव जी यांची जयंती म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर आपल्या मनातील द्वेष मिटवून प्रेम, सत्य, सेवा, परमात्म्याचे स्मरण आणि मानवतेचा दीप प्रज्वलित करण्याचा दिवस आहे. त्यांच्या शिकवणीचा एक विचार जरी आपण आपल्या जीवनात आचरणात आणला, तरी आपले जीवन आणि समाज अधिक सुंदर होऊ शकतो. श्री गुरु नानक देव जी यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! त्यांच्या पवित्र शिकवणीने प्रत्येकाच्या जीवनात सुख, शांती, सद्बुद्धी, प्रेम, परमात्म्यावरील श्रद्धा आणि मानवतेची भावना निर्माण होवो.

गुरु नानक नाम, चढदी कला, तेरे भाणे सरबत का भला!

मांडवीत बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

मांडवी/प्रतिनिधी- आदिवासी समाजाचे महानायक, क्रांतिकारक आणि जननायक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती मांडवी येथे आदिवासी बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली.



या प्रसंगी आदिवासी बांधवांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्सवात सहभाग नोंदविला. ढेमसा या पारंपरिक आदिवासी नृत्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. तसेच भव्य मिरवणूक काढून ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक नृत्याच्या तालावर भगवान बिरसा मुंडा यांच्या विचारांचा जयघोष करण्यात आला. मिरवणुकीत आदिवासी महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाला आ.भीमरावजी केराम, संध्याताई राठोड, प्रफुल्ल राठोड, आनंद मच्छेवार, सरपंच सुमनबाई पेंदोर, माजी सरपंच कमलबाई पेंदोर, गजानन बंडेवार, रमेश बद्दीवार, संजीवरेड्डी येल्टीवार, दिपक नागभीडे, विनोद मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती.आ. केराम यांनी आदिवासी समाजाच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प या कार्यक्रम तुन केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

कागदोपत्री हिरवळ,प्रत्यक्षात रोपांची माती...!

काही प्रशासकीय कार्यालयाच्या आवारातच रोपांची दयनीय अवस्था

शेख चांदपाशा

हदगांव:पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि वसुंधरा हिरवीगार करण्याच्या उद्देशाने शासनाकडून दरवर्षी लाखो-कोटी रुपयांचा निधी खर्च करून वृक्षारोपणाच्या मोहिमा राबवल्या जातात मात्र, या मोहिमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत होते, याचे संतापजनक चित्र हदगाव शहरातील काही प्रशासकीय कार्यालयाच्या परिसरात पाहायला मिळत आहे. वृक्षारोपणाच्या नावाखाली मोठा गाजावाजा केला जात असताना दुसरीकडे शासकीय रोपे अक्षरशः काही प्रशासकीय कार्यालयाने उघड्यावर फेकून दिल्याचे चित्र समोर आले आहे.



'झाडे लावा, झाडे जगवा' असा संदेश देत सोशल मीडियावर वृक्षारोपणाचे फोटो प्रसिद्ध केले जातात. मात्र, प्रत्यक्षात लावलेल्या रोपांचे संगोपन आणि संवर्धन करण्याकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याचे या प्रकारावरून दिसून येत आहे. विशेष म्हणजे, ज्या प्रशासकीय कार्यालयांच्या माध्यमातून शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि देखरेख अपेक्षित आहे, त्याच कार्यालयाच्या परिसरात रोपांची अशी दुरवस्था होणे ही गंभीर बाब मानली जात आहे. शासकीय निधीतून नर्सरीमध्ये तयार केलेली अथवा खरेदी केलेली रोपे योग्य वेळी जमिनीत लावून त्यांचे संगोपन करणे आवश्यक होते. मात्र, नियोजनाचा अभाव आणि संबंधितांच्या अनास्थेमुळे ही रोपे वापराविना पडून राहिली आहेत. परिणामी, शासनाचा पैसा खर्च होऊनही अपेक्षित पर्यावरण संवर्धनाचे उद्दिष्ट साध्य होत नसल्याचे सध्या तरी चित्र आहे. दरवर्षी वृक्षारोपणाच्या नावाखाली विविध प्रशासकीय कार्यालय कडून किती रोपे लावली जातात, त्यापैकी किती रोपे जगतात आणि त्यांच्या देखभालीसाठी किती निधी खर्च केला जातो, याची प्रत्यक्ष पडताळणी होते का की केवळ कागदोपत्री आकडेवारी पूर्ण करून वृक्षारोपण मोहिमेचे यश दाखवले जाते, असा सवाल वृक्ष प्रेमी नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील एका प्रशासकीय कार्यालयाच्या परिसरातच शासकीय रोपांची अशी दयनीय अवस्था होत असेल, तर ग्रामीण भागात आणि शहरातील इतर ठिकाणी इतर प्रशासकीय कार्यालय द्वरे लावलेल्या रोपांच्या संगोपनाची काय स्थिती असेल? शासनाच्या निधीतून आणलेल्या रोपांची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, वृक्षारोपणासाठी झालेला खर्च आणि रोपांच्या देखभालीची चौकशी करावी तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी व जागरूक नागरिकांकडून होत आहे.

संविधान दिनानिमित्त १६ नोव्हेंबरला भव्य संविधान रॅली

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय संविधान दिनानिमित्त गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड येथे भव्य संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, नांदेड यांच्या वतीने सकाळी ८ वाजता या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी केले आहे. या रॅलीचा प्रारंभ महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून होणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले पुतळा ते शिवाजीनगर, कलामंदिर, मुथा चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गाने रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ पोहोचेल. तेथे भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात येणार आहे.



भाग्यनगर येथील सिद्धी गणेश मंदिरात सार्वजनिक तुळशी विवाह संपन्न झाला. यावेळी माजी नगरसेविका अरुंधती पुरंदरे, भाजपच्या युवती आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा शांभवी साले यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जिल्ह्यातील ५ लाख ६८ हजार शेतकऱ्यांना दुष्काळी अग्रीम अनुदान वितरित

नांदेड/प्रतिनिधी-दुष्काळ २०२६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील ८ लाख ७३ हजार ३१ शेतकऱ्यांची माहिती शासनाकडे सादर करण्यात आली आहे. त्यापैकी ५ लाख ६८ हजार २२० शेतकऱ्यांना शासनस्तरावरून थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने अग्रीम अनुदान अदा करण्यात आले आहे. उर्वरित शेतकऱ्यांच्या अनुदानाबाबत शासनाकडून प्राप्त लाभार्थी माहिती, पात्रता निकष आणि बँक खात्याशी संबंधित तांत्रिक बाबींची पूर्तता महत्त्वाची असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सामाईक खातेदारांपैकी एका खातेदारालाच मदत देय आहे. तसेच एकाच खातेदाराची एकापेक्षा अधिक गटांत, गावांत, तालुक्यांत किंवा जिल्ह्यांत जमीन असल्यास त्याला एकदाच मदत मिळणार आहे. त्यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांच्या संख्येत काही प्रमाणात तफावत येऊ शकते. सामाईक क्षेत्रातील तसेच अकृषिक क्षेत्रातील अपात्र लाभार्थी शासनाच्या निकषांनुसार प्राप्त माहितीच्या आधारे वगळण्यात आले आहेत. जिल्ह्यात जवळपास १.३६ लाख अकृषिक खातेदार आहेत. त्यांना सदर मदत देय ठरत नाही. ज्या शेतकऱ्यांच्या नोंदी योग्य आहेत; मात्र त्यांच्या बँक खात्याला आधार संलग्न नसणे, आधार अद्ययावत नसणे, ई-केवायसी पूर्ण नसणे किंवा आधार संलग्नीकरण (सीडिंग) न झाल्यामुळे तसेच थेट लाभ हस्तांतरणाची (डीबीटी) सुविधा सक्रिय नसल्यामुळे अनुदान जमा होण्यात अडचणी येत आहेत. अशा प्रकरणांत शासनाने जमा केलेली मदत तांत्रिक कारणास्तव तात्पुरती स्थगित राहू शकते. बँक खात्याला आधार संलग्न करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अनुदानाची रक्कम अदा होऊ शकते. त्यामुळे प्रलंबित अनुदान असलेल्या शेतकऱ्यांनी ई-केवायसी, आधार संलग्नीकरण आणि डीबीटी सुविधा सक्रिय असल्याची खात्री करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

लोहा-कंधार मतदारसंघात शिवसेना वाढीसाठी विशेष लक्ष देणार-ना.प्रकाश आबिटकर

कंधार/प्रतिनिधी-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शिवसेना पक्ष अधिक भक्कम होत असून, नांदेड जिल्ह्यातही शिवसेनेची ताकद झपाट्याने वाढत आहे. शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांच्या रूपाने शिवसेनेला एक लढाऊ आणि जनतेच्या प्रश्नांची जाण असलेले नेतृत्व मिळाले आहे. नांदेड जिल्ह्याचा संपर्कप्रमुख म्हणून आगामी काळात लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाकडे विशेष लक्ष देऊन शिवसेना पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही राज्याचे आरोग्यमंत्री तथा नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख ना. प्रकाश आबिटकर यांनी दिली.

कंधार येथे नवनिर्मित उपजिल्हा रुग्णालयाच्या लोकार्पण सोहळ्यासाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आले असता, त्यांनी शिवसेना शेतकरी परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शंकर अण्णा धोंडगे यांच्या जनसंपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी उपस्थित शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे, दत्ता पा. पवार दिलीपदादा धोंडगे, शिवराज पाटील धोंडगे यांच्यासह शिवसैनिकांनी त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी बोलताना ना. प्रकाश आबिटकर म्हणाले की, शिवसेना हा ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण करणारा पक्ष आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेची ताकद वाढत आहे. मात्र, एवढ्यावरच न थांबता महाराष्ट्रात शिवसेनेचे एकहाती नेतृत्व निर्माण करण्यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने प्रामाणिकपणे प्रयत्न केले पाहिजेत. जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख आणि शहरप्रमुखांनी संघटनात्मक बांधणीवर भर देत पक्षवाढीसाठी जोमाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी विलास हुबाड, माऊली तिडके, भास्कर हातने, गजानन पाटील कराळे, फुलाजी पाटील ताटे, प्रकाश पाटील चव्हाण,अन्वर शेठ पठाण, अशोक बोदगिरे, प्रकाश पाटील आव्हाड, जीवन पाटील वडजे, अशोक मामा सोनवणे, सुभाष मोरे आदीसह अनेक शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते

जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी. ए. खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७४४/२०२६
निर्मलाबाई वि.निरंक

अर्जदार : १. निर्मलाबाई साहेबराव गायकवाड, वय ५५ वर्षे धंदा गृहिणी, २. संतोष साहेबराव गायकवाड, वय ३७ वर्षे धंदा मजुरी, रा.मालेगाव रोड, भगवान नगर, तरोडा खु. नांदेड, ३. किशोर साहेबराव गायकवाड, वय ३६ वर्षे धंदा मजुरी, रा.भगवान नगर, तरोडा खु. नांदेड, ४. विनोद साहेबराव गायकवाड, वय ३५ वर्षे धंदा मजुरी, रा.भगवान नगर, मालेगाव रोड, नांदेड, ५. प्रमोद साहेबराव गायकवाड, वय ३३ वर्षे धंदा मजुरी रा.भगवान नगर, तरोडा खु. नांदेड, ६. अमोल साहेबराव गायकवाड, वय ३० वर्षे धंदा मजुरी, रा. मालेगाव रोड, भगवान नगर, तरोडा खु. नांदेड, ७. विश्वजीत साहेबराव गायकवाड, वय २८ वर्षे धंदा मजुरी, रा. मालेगाव रोड, तुळशीराम नगर तरोडा खु. नांदेड, ८. संध्या साहेबराव गायकवाड, वय २७ वर्षे धंदा घरकाम, रा. भगवान नगर, स्वयंवर मंगल कार्यालय, तरोडा खु.नांदेड.

विरूद्ध

गैरकर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत साहेबराव इरबाजी गायकवाड यांचे वारस आहेत. मयत साहेबराव इरबाजी गायकवाड यांचा दिनांक ०४/०२/२०२४ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ ते ७ ही मयताची मुले व अर्जदार क्र.८ ही मयताची मुलगी आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत: हजर राहून या न्यायालयात दिनांक २२/१२/२०२६ रोजी पर्यंत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २१.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयाने दिला.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
५ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर नांदेड

''आदेशावरून''
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर नांदेड

जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४२७/२०२६
(CNR No.MHND10-001387-2026)

अर्जदार - १. जमनबाई भ्र.लक्ष्मण पथळे, वय ७० वर्षे धंदा-घरकाम, २. हनमंत पि. लक्ष्मण पवले, वय ५१ वर्षे धंदा-शेती, ३. मनोहर पि.लक्ष्मण पवळे, वय ४८ वर्षे धंदा-शेती, ४. निलाबाई भ्र. जगन्नाथ गायकवाड, वय ४५ वर्षे धंदा-घरकाम अर्जदार क्र.१ ते ४ रा.औराळ ता.कंधार जि.नांदेड, ५. कलावती भ्र. मारोती कल्याणकर, वय ४० वर्षे धंदा-घरकाम रा.गोगदरी ता.कंधार जि.नांदेड, ६. प्रभावती भ्र.भास्कर कदम, वय ३८ वर्षे धंदा-घरकाम रा.औराळ ता.कंधार जि. नांदेड, ७ विष्णुकांता भ्र.माधव महागावे, वय ३५ वर्षे धंदा-घरकाम रा.गोगदरी ता.कंधार जि.नांदेड.

विरुध्द गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-जे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती अर्जदार क्र.२ ते ६ यांचे वडिल नामे लक्ष्मण गोविंद पवळे हे होते ते दिनांक १३/०८/२०२६ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयताची आई नामे विठाबाई गोविंद पवळे यापुर्वीच मयत झाल्या आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, लक्ष्मण गोविंद पवळे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत लक्ष्मण गोविंद पवळे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत लक्ष्मण गोविंद पवळे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलामार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०१/१२/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन,
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

नाभिक समाजाचे स्नेहमिलन व संवाद बैठक उत्साहात संपन्न



नांदेड/प्रतिनिधी-जिवाजी महालेंचा पराक्रम आणि कर्तृत्व हा नाभिक समाजाच्या स्वाभिमानाचा व संघर्षशीलतेचा प्रेरणास्रोत आहे. नाभिक समाज कधीही हातबल, लाचार किंवा दुर्बल नव्हता, तर अन्यायाविरुद्ध लढणारा आणि स्वाभिमानाने जगणारा समाज होता. त्यामुळे जिवाजी महालेंचा लढवय्या बाणा जपत समाजाने अन्याय-अत्याचाराविरुद्ध संघर्ष करण्याची भूमिका पुढे न्यावी, असे प्रतिपादन नांदेडचे प्रसिद्ध उद्योजक तथा मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष बालाजी ईबितदार यांनी केले.

नांदेड येथील राष्ट्रसंत सेना महाराज सभागृहात आयोजित नाभिक समाजाच्या स्नेहमिलन व संवाद बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बालाजी ईबितदार बोलत होते. पुढे बोलताना ईबितदार म्हणाले की, जिवाजी महाले यांच्या शौर्याचा इतिहास केवळ एका समाजापुरता मर्यादित नसून तो स्वराज्यनिष्ठा, त्याग, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेचा प्रेरणादायी इतिहास आहे. हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आणि त्यातून समाजात स्वाभिमान, एकजूट व संघर्षाची प्रेरणा निर्माण करणे आवश्यक आहे. जिवाजी महालेंचा वारसा मजबूतपणे पुढे नेण्यासाठी समाजाने संघटित होऊन आपली ऐतिहासिक ओळख आणि कर्तृत्वाची परंपरा जपली पाहिजे.या स्नेहमिलन व संवाद बैठकीला शिवरत्न जिवाजी महाले शौर्य पुरस्काराने गौरविण्यात आलेले विविध जातसमूहांतील मान्यवर पुरस्कारार्थी तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे असंख्य समाजबांधव उपस्थित होते. डॉ. श्रावण रॅपणवाड, गोविंदराम सुरनर, अक्षय डोके, प्रा. आर. डी. शिंदे, रामदास जिरोणकर, लक्ष्मण लिंगापुरे, सतीशचंद्र शिंदे, बाबा लिंगमपल्ली, प्रा. डॉ. दत्ता कुंचेलवाड, आर. जी. जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजनामागील भूमिका शिवरत्न जिवाजी महाले स्मारक समितीचे अध्यक्ष ॲड. गोविंद दळवी यांनी मांडली. सूत्रसंचालन प्रा. अशोक कुबडे यांनी केले, तर आभार सतीशचंद्र शिंदे यांनी मानले.

जाहीर प्रगटन

मा.तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,लोहा यांचे न्यायालयात
प्रकरण : जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत

अ.क्र.	
अर्ज दिनांक	०५.०८.२०२६
अर्जदार यांचे नाव	निलेश शिवकुमार पाटील रा. गंगापुर ता.उदगीर जि.लातुर
अर्जदार यांचेशी असलेले नाते व नाव	मुलगा-अवनेश निलेश पाटील
अर्जदार यांचे विरुध्द मुख्याधिकारी	मुख्याधिकारी नगर परिषद कार्यालय लोहा ता.लोहा
जन्म दिनांक	०८.०१.२०२५
मृत्यु दिनांक	----------
जन्म/मृत्युस्थळ	लोहा
जन्म/मृत्यू नोंदणी प्राधिकारी	मुख्याधिकारी नगर परिषद कार्यालय लोहा

ज्याअर्थी उपरोक्त वर नमुद अर्जदार यांनी न्यायालयात हजर राहून जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ शासन निर्णय १२ मार्च २०२५ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार/अर्जदार यांचे नातेवाइक यांच्या जन्माची/मृत्यूची नोंद घेण्यासाठी मुख्याधिकारी नगर परिषद कार्यालय लोहा ता.लोहा येथे नोंद उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार/अर्जदार यांचे नातेवाईक यांच्या जन्माची/मृत्यूची नोंद वर नमूद ठिकाणी घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास, त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक : १८/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार लोहा

जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ वे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह. दि. न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१७४३/२०२६

१. नईमा बेगम शेख मोईन वय ४९ वर्ष धंदा घरकाम रा.गल्ली नं.कामठा खूर्द ता.जि.नांदेड, २. समीया बेगम शेख रियाज वय २५ वर्ष धंदा घरकाम रा.कामठा खूर्द ता.जि.नांदेड

विरुध्द

निल

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअथी अर्जदार मयत शेख रियाज पि. शेख मोईन यांचे वारस आहेत मयत शेख रियाज पि.शेख मोईन यांचा मृत्यू दिनांक २२/०१/२०२५ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक २२/१२/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक १९/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क.लिपीक
४ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर नांदेड

आदेशावरून
स्वाक्षरित/-
स.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर नांदेड

राज्यात थंडीचा जोर आणखी वाढणार

पुणे:गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा बदल जाणवत आहे. उत्तर भारतातील वाढलेला हवेचा दाब आणि तेथून ईशान्येकडून वाहणारे थंड, कोरडे वारे यामुळे राज्यातील किमान तापमानात आणखी घट होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले असून, राज्यातील ग्रामीण भागात नोव्हेंबर अखेरपर्यंत कडाक्याची थंडी पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. नागपूरसह भंडारा, गोंदिया थंड राहणार आहे.

सध्या राज्यातील तापमानात मोठ्या प्रमाणात घट दिसून येत आहे. काही जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा पारा घसरल्याचेही चित्र आहे. मात्र मुंबईत तापमान सामान्य असून, सौम्य गारवा जाणवत आहे. मुंबईकरांना सध्या कडाक्याच्या थंडीचा अनुभव नसून, तापमान सामान्य पातळीच्या आसपास आहे. शनिवारी मुंबईत किमान तापमान १६ अंश, रविवारी १७ अंशांपर्यंत होते. मात्र, सोमवारी सकाळी त्यात वाढ होऊन पारा २० अंशांवर पोहोचला. भारतीय हवामान विभागाच्या नोंदीनुसार, सोमवारी सांताक्रूझ येथे २०.१ अंश, तर कुलाबा येथे २२.२ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदवण्यात आले. ही तापमाने सरासरीपेक्षा अनुक्रमे ०.५ आणि ०.९ अंशांनी कमी होती. त्यामुळे मुंबईत सध्या सौम्य गारवा आहे.दरम्यान, विदर्भातील अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ,चंद्रपूर आणि गडचिरोली या आठ जिल्ह्यांमध्ये थंडीचा जोर अधिक जाणवण्याची शक्यता आहे.हवामान अभ्यासक आणि भारतीय हवामानशास्त्र विभागाचे निवृत्त हवामान शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी हा अंदाज व्यक्त केला आहे. सोमवारी राज्यातील काही भागांत थंडी जाणवली.

आगीत जळालेल्या सचिन गारमेटंला नृसिंह मित्र मंडळाची आर्थिक मदत



नांदेड/प्रतिनिधी-नृसिंह मित्र मंडळ पदाधिकारी यांनी सामुदायिक तुळशी विवाह प्रसंगी अनाठायी खर्चाला बगल देत जुना कौठा साईबाबा कमान रोडवरील सचिन गारमेटंला लागलेल्या आगीत दुकान जळुन खाक झाले होते. या घटनेत पाच कोटी रुपये नुकसान झाले. दुकान मालक सचिन कुरडे यांना नृसिंह मित्र मंडळातर्फे आर्थिक मदत करून सहकार्य केले आहे.

जूना कौठा नांदेड येथील नृसिंह देवास्थानाचे भक्त असलेल्या सचिन कुरडे यांचें साईबाबा कमान वसरणी रोडवर सचिन गारमेटं होलसेल व्यापारी दुकान आहे. दिवाळी मध्ये ९ नोव्हेंबर रोजी रात्री एक वाजण्याच्या दरम्यान शार्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत दुकान जळुन खाक होऊन पाच कोटी रुपयांचा नुकसान झाले व परिवारातील सदस्यावर दुःखाचा डोंगर कोसळला.जुना कौठा येथे दरवर्षी नृसिंह मंदिर कौठा येथे सामुदायिक तुळशी विवाह सोहळा धुमधडाक्यात साजरा करण्यात येतो. परंतु यावर्षी अनाठायी खर्चाला फाटा देत साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या यावेळी ढोल ताशांच्या गजर व जेवणाला व इतर अनेक गोष्टीना बगल देत साध्या पध्दतीने साजरा करून सचिन गारमेटंला आर्थिक मदत उपस्थितीत करण्यात आली. यावेळी परिवारातील सदस्य यांची मने गहिवरून आली. नृसिंह मित्र मंडळ पदाधिकारी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, अशोक दिलेराव, मारोती पासवाड, विनोद काकडे व पदाधिकारी यांनी सहकार्य करून मदत केली या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक करून मित्र मंडळ यांच्ये अभिनंदन केले आहे.

टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

माहूर/प्रतिनिधी-शहीद-ए-वतन हजरत टिपू सुलतान रहमतुल्लाह अलैह यांच्या जयंतीचे औचित्य साधून अल्फलाह ग्रुप, माहूरच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरातून एकूण ७० रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.



दि.२३ नोव्हेंबर रोजी अबू फंक्शन हॉल, टिपू सुलतान चौक, माहूर येथे या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील युवकांसह विविध क्षेत्रांतील नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदानासाठी युवकांनी दाखविलेला उत्साह विशेष उल्लेखनीय ठरला. अपघातग्रस्त, गंभीर आजारांनी त्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया तसेच प्रसूतीदरम्यान महिलांना अनेकदा तातडीने रक्ताची गरज भासते. अशा गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्ताचा तुटवडा दूर करण्यासाठी हातभार लागावा, या उदात्त हेतूने अल्फलाह ग्रुपने हा उपक्रम राबविला.रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्याला जीवनदान देण्याचे महान कार्य आहे. त्यामुळे निरोगी नागरिकांनी रक्तदानाबाबत जागरूकता बाळगून नियमित रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.या उपक्रमाच्या आयोजनात अजीम सय्यद, शोएब पठाण, जीशान शेख, नजीर शेख, इमरान, बिलाल कुरेशी, शोएब मलिक आणि जब्बार शेख यांनी प्रमुख भूमिका बजावली.

उमरखेड तालुक्यात मटका आणि अवैध दारु विक्रीचा सुळसुळाट

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड तालुक्यात सध्या मटका आणि अवैध दारूविक्रीने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. गाव तिथे दारूचा अड्डा, अशी विदारक परिस्थिती निर्माण झाली असून, ग्रामीण भागातील शांतता आणि सामाजिक स्वास्थ्य दिवसेंदिवस पूर्णपणे बिघडत चालले आहे. तालुक्यातील जवळपास प्रत्येक छोट्या-मोठ्या गावात पानटपरी, चहाचे स्टॉल आणि दुकानाच्या आडून मटका काउंटर चालवले जात आहेत. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत या ठिकाणी मटका लावण्यासाठी तरुणांची गर्दी दिसून येते.

अवैध दारू विक्रीने तर कहर केला आहे. परवानाधारक दुकानांपेक्षा अवैध अड्ड्यांवरच दारू सहज मिळत आहे. देशी-विदेशी दारू आता घरपोच मिळू लागली असून, केवळ एका फोन कॉलवर दारू घरपोच मिळत आहे. त्यामुळे दारू पिणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. या व्यसनाच्या विळख्यात तालुक्यातील तरुणाई मोठ्या प्रमाणात सापडली असून, शाळा-महाविद्यालयात शिकणारी मुले, शेतात राबणारे तरुण, तसेच रोजंदारी करणारे मजूरही दारू आणि मटक्याच्या आहारी गेले आहेत. सुरुवातीला हौस म्हणून सुरू झालेले व्यसन आता त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले आहे. परिणामी अनेकांचे संसार उध्वस्त होत असून घरात रोज भांडणे, मारहाण, मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष, कर्जबाजारीपणा अशा समस्या वाढल्या आहेत. महिला आणि मुलांना या व्यसनाचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक महिलांनी तर पतीच्या व्यसनाला कंटाळून माहेरी जाण्याचा मार्ग पत्करला आहे. विशेष म्हणजे हे अवैध धंदे उघडपणे सुरू असूनही त्यांच्यावर ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. अधूनमधून होणारी किरकोळ कारवाई म्हणजे केवळ देखावा असून, कारवाईनंतर काही दिवसांतच हे अड्डे पुन्हा सुरू होतात, असा आरोप नागरिक करीत आहेत.या अवैध धंद्यांमुळे गावातील सामाजिक वातावरणही बिघडले आहे. अड्ड्यांजवळ होणारी भांडणे, शिवीगाळ, महिलांची होणारी छेडछाड यामुळे गावकऱ्यांना रात्री-अपरात्री बाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. दरम्यान, या अवैध मटका आणि दारूविक्रीवर तातडीने कडक कारवाई करून तालुका व्यसनमुक्त करण्याची मागणी सर्व स्तरांतून जोर धरू लागली आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री कारवाई न करता, या धंद्यांच्या मुळावर घाव घालावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

नशामुक्त युवा विकसित भारतच्या संकल्पनेतून युवा संसद कार्यक्रम उत्साहात

धर्माबाद/प्रतिनिधी-भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत माय भारत केंद्र, नांदेड यांच्या वतीने नशामुक्त युवाविकसित भारत या संकल्पनेवर आधारित युवा संसद कार्यक्रम शनिवार, दि.२१ रोजी हु. गोविंदराव पानसरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धर्माबाद येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्ञानेश्वर बोंडवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कैलास गायकवाड व माहेश्वरी गायकवाड उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून वरिष्ठ संपादक शिवराज गाडीवान, वरिष्ठ संपादक हानमंतु देसाई आणि सोनकांबळे यांची उपस्थिती होती. मान्यवरांनी युवकांना व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासात सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले.आजच्या आधुनिक युगात युवकांमध्ये वाढत चाललेली व्यसनाधीनतेची प्रवृत्ती ही समाजासमोरील गंभीर समस्या बनली आहे. तंबाखू, गुटखा, मद्य आणि इतर अमली पदार्थांच्या व्यसनामुळे तरुण पिढीचे आरोग्य, शिक्षण, कौटुंबिक जीवन आणि भविष्य धोक्यात येत आहे. व्यसनाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नसून संपूर्ण कुटुंब आणि समाजव्यवस्थेवर होत असतो. त्यामुळे युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आरोग्यदायी, शिस्तबद्ध आणि सकारात्मक जीवनशैली अंगीकारणे काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. युवा संसद कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक प्रश्नांवर आपले विचार मांडण्याची, चर्चेत सहभागी होण्याची आणि नेतृत्वगुण विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कारवाई

अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांचा इशारा

माहूर/प्रतिनिधी-शहरातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर माहूर पोलीस ठाण्यात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत सोशल मीडियावर धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या, आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल असा कडक शब्दात भोकरच्या अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांनी समाजकंटकांना इशारा दिला.

माहूर शहरात दि.२० रोजी टिपू सुलतान जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकी दरम्यान आक्षेपार्ह गाणे वाजविण्यात आल्याच्या होती. बैठकीत बोलताना अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील म्हणाल्या की, शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून कोणत्याही समाजाच्या भावना दुखावतील, धार्मिक तेढ निर्माण होईल किंवा दोन समाजांत वाद निर्माण होईल, अशा पोस्ट, कमेंट अथवा संदेश प्रसारित करू नयेत. अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अफवा पसरविणाऱ्यांनाही सहकार्य करू नये. कायदा हातात घेणाऱ्यांची कोणत्याही परिस्थितीत गय केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. शहरातील शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात येणार असून, यापूर्वी गुन्हे दाखल असलेल्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांना प्रतिबंधात्मक कारवाईच्या अनुषंगाने नोटिसा बजावण्यात येणार आहेत. तसेच डीजेच्या वापराबाबत कठोर भूमिका घेत यापुढे डीजेला कायमचा बंद ठेवण्याचा इशाराही बैठकीत देण्यात आला. पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातूनच धार्मिक व सामाजिक कार्यक्रम शांततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्यासह शांतता समितीचे सदस्य, पोलीस कर्मचारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.



नांदेड शहरातील प्रभाग क्र.१९ मधील विविध विकास कामांचे भूमीपुजन आ.आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे महानगरप्रमुख तुलजेश यादव, माजी नगरसेवक संजय मोरे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुखेड उपजिल्हा रुग्णालयाच्या दूरवस्थेच्या विरोधात काँग्रेसचे २६ रोजी धरणे आंदोलन

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड उपजिल्हा रुग्णालयातील ढासळलेल्या आरोग्य सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आणत रुग्णालयाच्या कारभाराविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. रुग्णालयातील बंद पडलेल्या तपासणी सुविधा, औषधांचा अभाव, वैद्यकीय यंत्रणांची निष्क्रियता, रुग्णांना बाहेरील मेडिकलमधून औषधे व वैद्यकीय साहित्य खरेदीतील कथित गैरव्यवहार या मुद्यांवर भारतीय संविधान दिनी म्हणजे दि.२६ रोजी संविधान बचाव धरणे आंदोलन केले जाणार आहे.

प्रदेश काँग्रेसचे प्रदेश सचिव डॉ.श्रावण रॅपनवाड आणि काँग्रेसचे शहर अध्यक्ष हनमंत नारनाळीकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना याबाबत निवेदन देण्यात आले. मुखेड तालुक्यातील ग्रामीण व गरीब नागरिकांसाठी उपजिल्हा रुग्णालय हे महत्वाचे आरोग्य केंद्र आहे. मात्र, रुग्णालयातील अनेक सुविधा बंद अथवा अपुऱ्या अवस्थेत असल्याने नागरिकांना उपचारासाठी आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. सर्वसामान्य नागरिकांना संविधानाने दिलेला जगण्याचा व आरोग्याचा मूलभूत अधिकार प्रत्यक्षात मिळावा, यासाठी आंदोलन केले जाणार आहे. मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयास भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने नामकरण करण्यात यावे, रुग्णालयातील बंद असलेली रिक्त व लघवी तपासणी कक्ष (पॅथॉलॉजी लॅब) तात्काळ पूर्ववत सुरु करुन रुग्णांना आवश्यक तपासण्या उपलब्ध करुन द्याव्यात, औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करावा अशा अनेक मागण्या काँग्रेसने केल्या आहेत.

संविधान दिनानिमित्त निबंध स्पर्धा व प्रश्नमंजूषाचे आयोजन

देगलूर/प्रतिनिधी-अडत व्यापारी शिक्षणा संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर येथील लोकप्रशासन विभाग आणि द फोरम ऑफ पब्लिक ऍडमिनिस्ट्रेशन यांच्या सामंजस्य करारांतर्गत दि.२६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त खुली निबंध स्पर्धा व प्रश्नमंजूषा आयोजित करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत निबंध स्पर्धा भारत निर्वाचन आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आयोजित करण्यात आली असुन. इच्छुक विद्यार्थ्यांनी लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा. बी. आर. कतूरवार, प्रा. संजय देबडे, प्रा.यादव भुयारे यांच्याकडे नाव नोंदणी करुन संविधान जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यात सहभाग घ्यावा, असे अवाहन प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी केले आहे. या निबंध व प्रश्नमंजूषा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतिय येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रमाणपत्र आणि स्पर्धा परीक्षेस उपयुक्त संदर्भ ग्रंथ पारितोषिक म्हणून दिले जाणार आहेत. निबंध स्पर्धेसाठी विषय मतदानाचे महत्त्व व प्रश्नमंजुषासाठी विषय भारतीय संविधानातील विविध तरतूदी असा ठरवीन्यात आला आहे.

अंजनाबाई केंद्रे यांचे दुःखद निधन

किनवट/प्रतिनिधी-भारतीय जनता पक्षाचे किनवट-माहूर विधानसभा अध्यक्ष बाबुराव केंद्रे यांच्या मातोश्री अंजनाबाई दिगांबर केंद्रे (वय ७६) यांचे सोमवारी (ता.२३) रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (ता. २४) दुपारी बोधडी खुर्द येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्व.अंजनाबाई या भाजपचे विधानसभा अध्यक्ष बाबुराव



केंद्रे यांच्या मातोश्री, तर राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग (नवी दिल्ली) येथील वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे यांच्या आत्या आणि सासू होत्या. अंत्यविधीस किनवटचे आ. भीमराव केराम यांच्यासह भाजप व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी केंद्रे कुटुंबीयांचे सांत्वन करत स्व.अंजनाबाई यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

पान १ वरुन

अ.भा.मराठी साहित्य...

अनुवाद झाले आहेत. १९८० दशकात लिहिलेली आणि प्रकाशित झालेली अक्करमाशी ही त्यांची आत्मकथा त्यांच्या साहित्यिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. या आत्मकथेत त्यांनी स्वतःच्या जीवनातील अनुभवांच्या माध्यमातून जातिव्यवस्था, अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, गरिबी आणि मानवी अस्मितेचे प्रश्न मांडले. अक्करमाशी या पुस्तकाने मराठी आत्मकथनाच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली. या पुस्तकाचे इंग्रजीसह अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत.डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या सनातन या कादंबरीला २०२० चा प्रतिष्ठेचा सरस्वती सन्मान पुरस्कार जाहीर झाला होता. हा पुरस्कार के. के. बिर्ला फाउंडेशनतर्फे दिला जातो. या पुरस्कारामुळे त्यांच्या साहित्याची राष्ट्रीय पातळीवर चर्चा झाली होती. विशेष म्हणजे, सरस्वती सन्मान मिळवणारे ते पहिले दलित लेखक ठरले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४